सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सैनिक स्कूल, सातारा येथील विद्यार्थ्यांच्या भोजन भत्त्यासाठी निधी वितरणास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः-सासैशा-२०१७/प्र.क्र.१७१/एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख : २७ मार्च, २०१८

<u>वाचा</u> -

१) शासन निर्णय क्रमांक: सासैशा २०१२/(८८/१२) माशि-.७ शालेय शिक्षण विभाग, दिनांक ५जुलै, २०१३
२) शासन परिपत्रक क्रमांकः पूरक २०१७/प्र.क्र.९४/ अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, दिनांक ३०.६.२०१७
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. माध्यमिक-ब/२०१७-१८ /टे-३०३/११०४, दि.२०.०२.२०१८ चे पत्र
४) शासन निर्णय क्रमांक: सासैशा २०१७/१७१)/ एसएम-६, शालेय शिक्षण विभाग, दिनांक २२.९.२०१७
५) शासन निर्णय क्रमांक: अनुवि-४९१७/प्र.क्र.३२/अर्थसंकल्प, शालेय शिक्षण विभाग, दिनांक २१.०२.२०१८

<u>शासन निर्णय</u>:-

सातारा सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आहारभत्ता प्रति विद्यार्थी प्रतिदिन रु. ७९.२०/- प्रमाणे २९५ दिवसांसाठी अपेक्षित खर्चाच्या ७०% म्हणजे रु. १,०१,२३,६२०/- इतका निधी वितरीत करण्यास संदर्भाधीन क्र. (४) प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णय याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२. शासन निर्णय दिनांक ५.७.२०१३ नुसार सातारा सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन रु.७२/- प्रमाणे २९५ दिवसांसाठी आहारभत्ता अनुज्ञेय आहे. त्यानुसार ६१९ विद्यार्थ्यांसाठी २९५ दिवसांसाठी रू. ७२/- प्रमाणे रू. १,३१,४७,५६०/- (रुपये एक कोटी एकतीस लाख सत्तेचाळीस हजार पाचशे साठ फक्त) इतका निधी देय आहे. वित्त विभागाच्या आदेशानुसार ९० टक्के च्या मर्यादेत म्हणजेच रु. १,१८,३२,८०४/- (एक कोटी अठरा लाख बत्तीस हजार आठशे चार फक्त) इतका निधी वितरीत व खर्च करण्यास शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर खर्च "मागणी क्रमांक ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण,०२ माध्यमिक शिक्षण-११०, अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य (००) (०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान (२२०२ ०४६९), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी तसेच सहायक संचालक (लेखा) माध्यमिक व उच्च माध्यमिक,शिक्षण संचालनालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७ व क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक ३०.६.२०१७ च्या परिपत्रकातील आदेशांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

५. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन परिपत्रक, दिनांक ३०.६.२०१७ व शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक २१.२.२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२७१६२८४८३३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sangita Dinesh Shelke

Digitally signed by Sangita Dinesh Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ace0ca0b129ab4da8f9e911057d75e7fbf6f6bd0b55e8ff7ca0deacfa15e1c0, cn=Sangita Dinesh Shelke
Date: 2018.03.27 16:29:46 +05'30'

(संगिता दि. शेळके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
२. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण)मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
३. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
५. सहायक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे
६. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा.
७. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
८. प्रधान महालेखापाल(लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
१०.वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
११.प्राचार्य, सैनिकी स्कूल, सातारा
१२.सचिव, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
१३.मानद सचिव, बोर्ड ऑफ गव्हर्नस सैनिकी स्कूल, नवी दिल्ली.
१४.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.वित्त विभाग,व्यय-५/अर्थसंकल्प-३ मंत्रालय,मुंबई-३२
१६.निवड नस्ती (एसएम-६)